# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**भातकुली (जि.अमरावती) येथील पोलीस स्टेशन व पोलिसांचे निवासस्थान बांधण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत**

**(१) ११४५ (१५-०१-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली (जि.अमरावती) येथील पोलीस स्टेशन व पोलिसांची निवासस्थाने बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार शासनाने अद्यापपर्यंत निधी मंजूर केला नाही, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणी कार्यवाही केली असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१५) :**(१) व (२) पोलीस स्टेशन भातकुली, जि.अमरावती येथील पोलीस स्टेशन व निवासस्थाने बांधण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईत राबविण्यात येणाऱ्या मेट्रो रेल्वे प्रकल्पात वाशी, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली या मार्गाचा समावेश करण्याबाबत**

**(२) २४६८ (१७-११-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील वाहतुक व परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या मेट्रो रेल्वे प्रकल्पात वाशी, कोपरखैरणे, घणसोली व ऐरोली या मार्गाचा समावेश करण्याबाबत फेरसर्व्हेक्षण करण्याचे मार्च-एप्रिल, २०११ मध्ये सभागृहात जाहिर करूनही अद्यापि फेरसर्व्हेक्षण करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फेरसर्व्हेक्षण न करण्याची कारणे काय आहेत व फेरसर्व्हेक्षण कधीपर्यंत करणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१२-२०१५)** :(१) व (२) नाही, नवी मुंबईत वाहतूक व परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या मेट्रो रेल प्रकल्पात वाशी, कोपरखैराणे, घणसोली व ऐरोली या मार्गाच्या फेरसर्व्हेक्षण करण्याचे मार्च-एप्रिल, २०११ मध्ये सभागृहात जाहिर केल्यानुसार सिडकोने आयआयटी मुंबई यांचेमार्फत फेरसर्व्हेक्षण करुन सदर अहवालाची  प्रत शासनाकडे पाठविण्यात आली आहे.

---

**नवी मुंबई क्षेत्रातील सिडको महामंडळाच्या अखत्यारितील बी एम टी सी मधील माजी कर्मचाऱ्यांना दुकाने / गाळे वितरीत करणेबाबत**

**(३) २४८३ (२३-१२-२०१४). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रातील सिडको महामंडळाच्या अखत्यारितील बी एम टी सी मधील माजी कर्मचाऱ्यांना अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांना दुकाने / गाळे वितरीत करण्याबाबतचा सिडको संचालक मंडळाने ठराव मंजूर संमत करुन शासनाच्या मंजुरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठरावावर शासनाचा निर्णय होऊन बी एम टी सी मधील माजी कर्मचाऱ्यांना वा त्यांच्या वारसांना दुकाने / गाळे यांचे वाटप करण्यात आले आहे काय,

(३) अद्यापि, शासनाचा निर्णय झाला नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५)** :(१) व (२) होय, नवी मुंबई क्षेत्रातील सिडको महामंडळाच्या अखत्यारीतील माजी कर्मचाऱ्यांना अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांना दुकाने /गाळ वितरीत करणेसाठी सिडको महामंडळाच्या संचालक मंडळाने पारीत केलेल्या ठराव क्र.१०८४०, दिनांक, २७ जुन, २०१३ ला शासनाने दिनांक ९ सप्टेंबर, २०१४ च्या पत्रान्वये मंजूरी दिली आहे, यासंदर्भात महामंडळातर्फे जागेची निवड करण्याची प्रक्रिया सध्या सुरु आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई येथील कामोठे नोड मधील भूखंड क्र.१ व एम.आय.डी.सी क्षेत्रातील भूखंड क्र. सी १ चे एकत्रीकरणाचा ना हरकत दाखला**

**(४) २६०८ (२३-१२-२०१४). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील कामोठे नोड मधील भूखंड क्र.१ व एम.आय.डी.सी क्षेत्रातील भूखंड क्र. सी १ चे एकत्रीकरणाचा ना हरकत दाखला दिनांक २ सप्टेंबर, २०११ रोजी दिला आहे,

(२) असल्यास साडे बारा टक्के योजनेनुसार व एमआयडीसी क्षेत्र असल्याने वेगवेगळया भूखंडाचा एकत्रीकरण करणे व वाढीव एफएसआय दोन्ही भूखंडांना सारखा देणे हे सिडकोच्या नियमानुसार आहे काय,

(३) नसल्यास, त्या संदर्भात काय कार्यवाही केली तसेच विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५)** :(१) होय,

(२) सदर दोन्ही भूखंडाचे मालकी हक्क वेगवेगळया महामंडळाकडे असल्यामुळे सिडकोच्या नगर रचना विभागाने भूखंडांच्या एकत्रिकरणाची व विकासनाची परवानगी नाकारली आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील भायखळा येथील डॉ. भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहाची जागा जमनालाल बजाज फाऊंडेशनला देण्याबाबत**

**(५) ५७१२ (०७-०४-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील डॉ. भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहाची जागा जमनालाल बजाज फाऊंडेशनला देण्याचा पालिकेचा निर्णय दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करुन शासनाने या निर्णयावर कोणती भूमिका घेतली आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५)** :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिडको, नवी मुंबई येथे अनेक प्रकल्पग्रस्त विविध पदांवर कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्याबाबत**

**(६) ८१६३ (०६-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको, नवी मुंबई येथे अनेक प्रकल्पग्रस्त विविध पदांवर कंत्राटी पध्दतीने काम करीत असून या सर्व प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना सरळ सेवा भरतीने सिडकोच्या सेवेत कायम करावे अशी मागणी सिडको प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती समितीने माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास व्यवस्थापकीय संचालक सिडको यांच्याकडे निवेदनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना सिडकोच्या सेवेत कायम करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) होय,

(२) प्रकल्पग्रस्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना सिडकोच्या सेवेत कायम करण्याबाबतची तरतुद नाही, शासन निर्णय दिनांक २१ जानेवारी, १९८० ३ फेब्रुवारी, २००७ २७ ऑक्टोबर, २००९ नुसार शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये नियुक्त्यांसाठी एकूण संवर्ग बळाच्या ५% पदावर सर्वोच्च प्राथम्यक्रम देण्याचा व प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या, नेमणूक जाहिरात देवून संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारांची पात्रता तपासून व स्पर्धा परीक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करावयाच्या आहेत,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे बोर्डी (ता. डहाणू, जि. पालघर) येथील सु.पे.ह हायस्कूल समोरील मैदानाची समुद्रांच्या लाटांमुळे होणारी धुप थांबविण्याबाबत**

**(७) ८४५२ (०६-०७-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बोर्डी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील सु.पे.ह हायस्कूल समोरील मैदानाची समुद्रांच्या लाटांमुळे होणारी धुप थांबविण्याकरीता धुप प्रतिबंधक बंधारा बांधण्याकरीता दिनांक १४ जानेवारी २०१५ रोजी लोकप्रतिनधीनी मा. मुख्यमंत्र्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही,

(२) मौजे बोर्डी ता. डहाणू, जि. पालघर येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे या कामाच्या रु. ४९९ लाख इतक्या खर्चाच्या ढोबळ अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यात आली आहे,

शा.नि.क्र.एस आय एय/०२१५/प्र.क्र. ६४/बंदर-२ दिनांक २१ मे, २०१५ अन्वये सदर योजना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यात आली असून सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करणे अपेक्षित आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिडकोच्या नोकरभरतीत मागासवर्गीय उमेदवार नोकरीपासून वंचित असल्याबाबत**

**(८) ८५६९ (०६-०७-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने नोकरभरती संदर्भात २००९ पासून लेखी आणि तोंडी परिक्षा देऊनही पात्र मागासवर्गीय उमेदवार नोकरीपासून वंचित राहिल्याने सन २००९ पासून सिडकोतील मागासवर्गीयांची भरती रखडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४०० पात्र मागासवर्गीय उमेदवार नोकरी पासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, शासनाने भरती प्रक्रिया पूर्ण करण्याकरीता कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१), (२), (३) व (४) नाही.

सन २००९ साली ज्या पदांसाठी लेखी आणि तोंडी परिक्षा झाल्या होत्या ती पदे भरण्यासाठी सन २००९ मध्ये कंत्राटी पध्दतीने मागासवर्गीयांसाठी पदे भरण्याबाबतची जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार सदर लेखी व तोंडी परिक्षेमध्ये जे उमेदवार पात्र ठरले होते त्यांच्या मुलाखती घेऊन त्यांना रुजु करु घेण्यात आले आहे. त्यामुळे मागासवर्गीय उमेदवारांना नोकरीपासून वंचित ठेवण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सन २००९ पासून सिडकोतील विविध पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या होत्या परंतु, प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे भरती प्रक्रिया स्थागित करण्यात आली होती. सदरची भरती प्रक्रियेवरील स्थगिती शासनाने उठविली असून ज्या पदांचा अनुषेश शिल्लक आहे ती पदे भरण्यासाठीची प्रक्रिया सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नफ्यात चालणा-या सार्वजनिक उपक्रमात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी लागू केल्याबाबत

**(९) १४१६१ (१०-०४-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्या. मुंबई हे महामंडळ सुरुवातीपासून आर्थिक नफ्यात चालत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचे वित्त विभागाने शासन निर्णय क्रमांक शासन १०.०९/प्र.क्र.१२१/सा.उ. मंत्रालय मुंबई दिनांक १९ डिसेंबर, २००९ नुसार राज्यातील नफ्यात चालणा-या सार्वजनिक उपक्रमात काम करणा-या कर्मचा-याना ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार सुधारीत वेतन श्रेणी लागू करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातील कर्मचा-याना ५ व्या व ६व्या वेतन आयोगानुसारच्या वेतन श्रेणीचे अद्याप कोणतेही (वेतन भत्ते, पी.,एफ,ग्रेज्युएटी, महागाई भत्त, वैद्यकीय लाभ व इतर फायदे) लाभ देण्यात आले नाहीत, याबाबत जनप्रतिनिधींनी सुध्दा दिनांक १६ नोव्हेंबर, २०१३ पासून उपरोक्त महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, मुख्य सचिव महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव रोजगार व स्वयंरोजगार विभाग, संबंधित खात्याचे मंत्री यांचेकडे सदर प्रकरणी पत्रव्यवहार करुन सुध्दा निर्णय अद्याप प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली अथवा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१२-२०१५) :**(१) होय.
(२) अंशत: खरे नाही.
(३) व (४) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून याबाबत सविस्तर प्रस्ताव मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यात आधारकार्ड विषयी जनजागृती करण्याबाबत**

**(१०) १६९५८ (१०-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद. येथील नागरिकांकडे कोणत्याही ठिकाणी महत्वाच्या कामांसाठी गेल्यास आधार कार्ड आहे काय यांची विचाराणा करण्यात येते परंतु मराठवाड्यातील नागरीकांमध्ये आधारकार्ड काढण्याबाबत उदासिनता असल्याचे माहे मे, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यातील औरंगाबाद, लातूर जिल्हा वगळता इतर जिल्ह्यात आधार कार्ड काढण्यासाठी उदासिनता दिसून येत असल्याने या जिल्ह्यात आधारकार्ड विषयी जनजागृती करण्याविषयी शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१५) :**(१) हे खरे नाही,
(२) औरंगाबाद विभागातील काही जिल्ह्यांमध्ये आधारकार्ड विषयी जनजागृती करण्यासाठी सोशल मिडीयाचा मोठया प्रमाणात वापर करण्यात आला आहे, त्याशिवाय शिबीर घेऊन गावात दवंडी देऊन, प्रसार माध्यमांचा वापर करुन त्याचप्रमाणे अंगणवाडयांमध्ये मेळावे भरवून,वृत्तपत्रे, लोकल केबलच्या माध्यमातून आधार कार्डाच्या नोंदणीबाबत जनजागृती केल्याने आधार कार्ड नोंदणीत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले आहे,
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगरुळ (ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती) येथे मंजूर करण्यात आलेले पोलिस स्टेशन सुरु करण्याबाबत**

**(११) १६९८७ (१०-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळ (ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती) येथे मंजूर करण्यात आलेले पोलिस स्टेशन त्वरीत सुरु करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री, यांना दि. ६.५.२०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे,

(२) सदर पोलीस स्टेशन सुरु होणेसंदर्भात हद्दनिश्चितीची अधिसूचना दिनांक ३ जुलै, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोहा (जि.नांदेड) शहरात व ग्रामीण भागात मुंबई-कल्याण मटका, जुगार मोठया प्रमाणात सुरु असल्याबाबत**

**(१२) १७१५२ (१०-०८-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) शहरात व ग्रामीण भागात मुंबई-कल्याण मटका, जुगार मोठया प्रमाणात सुरु असून, लोहा शहरात सुमारे ५०० च्या वर मटका जुगाराचे बुकी असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) हे खरे नाही, पोलीस ठाणे लोहा जिल्हा नांदेड यांचे कार्यकक्षेत मुंबई-कल्याण नावाचा मटका जुगार चालत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) पोलीसांची प्रतिमा मलीन करण्याच्या हेतुने याबाबतची बातमी वृतपत्रात प्रकाशीत झाली होती. माहे एप्रिल व त्यादम्यान मटका जुगाराचे ५०० बुकी असल्याची माहिती खोटी असून सदर भागात चोरुन लपुन मटका-जुगार खेळणा-यांवर व चालविणा-यांवर मागील १ वर्षाच्या कालावधीत पोलीस ठाणे लोहा येथे एकूण २७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

**लातूर येथील एमआयडीसीतील उज्वला प्रकल्प या वसतीगृहामधून चार तरुणी बेपत्ता झाल्याबाबत**

**(१३) १७२९१ (१०-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील एमआयडीसीतील उज्वला प्रकल्प या वसतीगृहामधून दिनांक २६ एप्रिल, २०१५ रोजी पहाटे २२ ते ३० वर्षे वयोगटातील चार तरुणी बेपत्ता झाल्या असुन अद्यापही त्यांचा शोध लागला नसल्याने वसतीगृहाच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असल्याचे सांगत जिल्हा प्रशासनाने सुरक्षेची पाहणी करावी अशी मागणी महिला बाल आयोग मार्फत करण्यात आली आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५)** :(१) प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी समुपदेशक, उज्वला प्रकल्प लातूर यांनी वस्तीगृहातून ४ मुली स्नान गृहाची खिडकी तोडून पळून गेल्याबाबत दिलेल्या अर्जावरुन पोलीस स्टेशन एमआयडीसी, लातूर येथे मिसींग क्र. ११/१५ दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी दाखल आहे. तथापि जिल्हा प्रशासनाने सुरक्षेची पाहणी करण्याबाबत महिला बाल आयागाने केलेल्या मागणीबाबतचे पत्र प्राप्त नाही.

(२) व (३) सदर पलायन केलेल्या मुलींचा शोध घेणेसाठी जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनला मुलीच्या वर्णनासह तपास याद्या तसेच फोटोचे पाम्पलेट पाठविण्यात येवून शोध घेणेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच नाशिक, बीड पोलीसांना शोध घेण्याबाबत कळविले आहे. लातूर शहरातील ग्रेन मार्केट, सर्व कॉलेज, ढाबे, रेल्वे स्टेशन, बस स्थानक, बाजारपेठा येथेही शोध घेण्यात आला आहे. पोलीस गॅझेट मध्ये पलायन केलेल्या मुलीचे फोटो पत्ते पाठवून शोध घेण्याबाबत कळविण्यात आले, तथापि अद्याप पलायन केलेल्या मुली मिळून आल्या नाहीत. शोध घेण्याची कार्यवाही सुर आहे.

---

**अहमदनगर तालुक्यातील जेऊर (बायजाबाईचे) गावातील दत्त मंदिरातील मूर्तीची अज्ञात इसमाने विटंबना केल्याबाबत**

**(१४) १७३३५ (१२-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर तालुक्यातील जेऊर (बायजाबाईचे) गावातील दत्त मंदिरातील मूर्तीची दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास एका अज्ञात इसमाने विटंबना केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, दत्त मंदिरा शेजारील जागेमध्येच हॉटेल असल्याने गेल्या दोन वर्षापासून सदरील हॉटेल हटविण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) जेऊर (बायजाबाईचे) गावातील दत्त मंदिराच्या जागेच्या वादाच्या कारणावरुन श्री दत्त मूर्ती व ओटा पाहरीने फोडून धार्मिक भावना दुखावून नुकसान केल्याबाबत एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा र.नं. I ९३/२०१५ भा.दं.वि. कलम २९५, ४२७ प्रमाणे दाखल करण्यात आलेला असून, सदर गुन्ह्यात दोन आरोपींना अटक केलेली आहे. त्यांची पोलीस कस्टडी व नंतर मॅजिस्ट्रट कस्टडी मिळविण्यात आली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील पवई येथील विहार तलावामध्ये गौतम बुध्दांच्या पुतळा बसविण्याबाबत**

**(१५) १७५२७ (११-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पवई येथील विहार तलावामध्ये हैदराबाद मधील हुसेन सागर तलावाप्रमाणे गौतम बुध्दांच्या पुतळा बसविण्याबाबत वारंवार अनेक समाजसेवी संघटनांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत महानगरपालिकेने आतापर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) मुंबईतील पवई येथील विहार तलावामध्ये गौतम बुध्दांचा पुतळा बसविण्याबाबत कोणतेही निवेदन अथवा मागणी प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई कुर्ला येथील कमानी जंक्शन ते साकीनाका जंक्शनपर्यंतच्या कुर्ला-अंधेरी रस्ता रुंदीकरणाबाबत**

**(१६) १७५३५ (१०-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कुर्ला येथील कमानी जंक्शन ते साकीनाका जंक्शनपर्यंतच्या कुर्ला-अंधेरी रस्ता रुंदीकरणासाठी मागील अनेक वर्षापासून मुंबई महानगरपालिकेकडे पाठपुरावा करुनही कोणती कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्ता रंदीकरणासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागील ४ वर्षात विविध स्तरावर पालिका प्रशासनाशी सतत पाठपुरावा केला कित्यकेदा रस्ता रोको, महानगरपालिका आयुक्त कार्यालयावर धडक मोर्चा काढून आंदोलनही केले असूनही याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्याने सततच्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना सतत नाहक त्रास सहन करावा लागत आहे हे पाहता शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती यंत्रणा रस्ते विभागामार्फत सदर रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम सुरु असून, विभाग कार्यालयामार्फत बाधित झोपडपट्यांच्या निष्कासनाची कारवाई माहे मे, २०१५ च्या पूर्वीपासून सुरु आहे.

महानगरपालिकेमार्फत सदर रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या झोपडी/बांधकामास नोटीसा बजावण्यात आल्या असून, त्यांची पात्र-अपात्रता ठरविण्याचे काम प्रगतीपथावर आहे त्यापैकी १४ पात्र झालेल्या निवासी झोपडी/बांधकामधारकांना पर्यायी सदनिका देऊन बाधित झालेली घरे निष्कासित करण्यात आलेली आहेत.

तसेच अनिवासी पात्र गाळेधारकांना पर्यायी जागा देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागु असतांना बैल कत्तल करण्यासाठी नेताना दिसल्याबाबत**

**(१७) १८०१६ (१२-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागु असतांना औरंगाबाद शहरात जालना रोड जवळीत केंब्रीज शाळेजवळच्या चौकात दिनांक १४ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास टेंपो आणि ट्रेलरची जोरदार धडक झाल्यामूळे ट्रकभरुन गाई आणि बैल कत्तलीसाठी आणल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाई आणि बैल कत्तलीसाठी घेऊन येणा-या नुतन कॉलनीतील खाटीक समीर कुरेशी फयाजखान याला पोलीसांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोषी असलेल्या खाटीकावर आतापर्यंत पोलीसांनी काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) होय,

प्रकरणी ५ आरोपीविरुध्द दि. १४ मे, २०१५ रोजी पोलीस स्टेशन एमआयडीसी सिडको गु.र.नं. ११७/२०१५ कलम २७९, ४२९ भा.दं.वि. व सह कलम ११ (१)(घ)(ड)(च)(ज) प्राण्यांना क्रुरतेची वागणुक अधिनीयम १९६० व कलम ५(१) (अ) प्राणी संरक्षण कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(२) होय.

सदर गुन्ह्यातील आरोपी फय्याज खान जिलानी खान व इतर १ आरोपीस दि.१५/५/२०१५ रोजी अटक केली आहे. तथापि आरोपी समीन अनीस कुरेशी याला मा.न्यायालयाने अटक पूर्व जामीन मंजूर केला आहे.

(३) सदर अटक आरोपींना मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे समोर हजर केले असता मा.न्यायालयाने आरोपीस न्यायलयीन कोठडी दिली असून उर्वरित आरोपींचा शोध चालू आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## मौज देवली (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथे दोन पोलीस खबऱ्यांची नक्षवाद्यांनी हत्या केल्याबाबत

**(१८) १८०९५ (१२-०८-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौज देवली (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथे दोन पोलीस खबऱ्यांची नक्षलवाद्यांनी दगडाने ठेचून हत्या केल्याची घटना दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) होय हे खरे आहे.

(२) व (३) (१) श्रीनिवास मलय्या पुप्पलवार, वय ३२ वर्ष, (२) शैलेश राघवलु कारेंगला, वय २५ वर्ष दोघेही आपआपले घरी झोपले असतांना, सिरोंचा नक्षल दलम कमांडर- सुनिल उर्फ विलास कुळमेथे, उपकमांडर-नंदु उर्फ वासुदेव बुच्चा आत्राम व त्यांचे इतर १० ते १५ बंदुकधारी नक्षलवाद्यांनी गैरकायद्याची मंडळी जमवून संगनमताने कट रचून बेकायदेशीर अग्निशस्त्रे जवळ बाळगून, दोघानांही देचली ते मुत्तापूर जाणाऱ्या रस्त्याकडे नेऊन डोक्याला मागील बाजुस काठीने जबर मारहाण करुन जिवानिशी ठार केले. सदर घटनेबाबत उपपोस्टे देचलीपेठा येठे अप क्र. ००२/२०१५, कमल ३०२, १४३, १४७, १४८, १४९, १२० (ब) भा.दं.वि., ३/२५ भाहका, १३,१६,१८,२० युएपी ॲक्ट अन्वये गुन्ह्याची नोंद करुन, तपासानंतर आरोपींचा शोध घेणेकामी सतत एसआरपी, एलाआरपी मार्फत आरोपींना अटक करण्याकरिता प्रयत्न केले आहे.

गडचिरोली जिल्ह्यांतर्गत पोलीस खबऱ्यांचे माध्यमाने गुप्त पध्दतीने मोठ्या स्तरावर नक्षल हालचालीची गोपनीय माहीती पुरवून वेळोवेळी नक्षल कारवायावंर आळा घालण्यास मृतकांनी अत्यंत बहुमोलाचे सहकार्य केलेले आहे.

मृतकांचे नातेवाईकांना प्रत्येकी महाराष्ट्र शासनाचे वतीने ५ लक्ष रुपये आणि केंद्र शासनाचे वतीने ३ लक्ष रुपये असे एकूण ८ लक्ष रुपये आर्थिक मदत मिळणार आहे. त्यापैकी महाराष्ट्र शासनकडील प्रत्येकी ५/५ लक्ष रुपये मंजूर झाले असून अतिशीघ्र संबंधित वारसांना धनादेशाद्वारे आर्थिक मदत देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील संवेदनशील ठिकाणी दहशतवादी हल्ले होण्याची शक्यता

**(१९) १८१७० (१२-०८-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालयासह एकूण ८४ ठिकाणे संवेदनशील असून त्याठिकाणी दहशतवादी हल्ले होण्याची शक्यता माहे एप्रिल, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात वर्तविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दहशतवादी हल्ल्यांबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही,
(२) ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १ ते ५ मधील मर्मस्थळे, सागरी तळ, ऐतिहासीक स्थळे व अतिमहत्वाचे व्यक्तींना शासकीय कार्यालयास आतंकवादी, दहशतवादी यांच्यापासून असलेल्या धोक्याबाबत नियतकालीन मुल्यामापन होण्याबाबत सुचीत करण्यात आले आहे. सदरचा आढावा यापुढे दर ३ महिन्यानी घेऊन अहवाल सादर करावा असे गुप्त वार्ता, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत कळविण्यात आले आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करुन योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आंबडवे (ता.मंडणगड जि.रत्नागिरी) येथील पर्यटक भवन पर्यटकांसाठी खुले करण्याबाबत**

**(२०) १८४१० (१२-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव असलेल्या आंबडवे (ता.मंडणगड जि.रत्नागिरी) येथे पर्यटकांसाठी २५ लक्ष रुपये खर्च करुन शासनाने पर्यटक भवन बांधले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१३ मध्ये हे पर्यटक भवन बांधून पूर्ण झाल्यानंतरही ते केवळ उद्‌घाटनाअभावी बंद अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हे पर्यटक भवन पर्यटकांसाठी खुले करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवही करण्यात आली वा येत आहे,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्यामार्फत जिल्हा वार्षिक योजना क वर्ग पर्यटन स्थळांचा विकास योजनेअंतर्गत सन २००८-०९ मध्ये दिलेल्या निधीतून सदर पर्यटक भवन बांधण्यात आले आहे.
(२) व (३) या कामाचे स्थापत्य काम पूर्ण करुन या इमारतीसाठी नवीन वीज कनेक्शन, पाणी पुरवठा इत्यादी बाबी माहे मे, २०१५ अखेर पूर्ण झाल्यानंतर इमारत वापरायोग्य झाल्यानंतर उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मंडणगड यांच्या दिनांक १६ जुलै, २०१५ च्या पत्रान्वये पर्यटन भवनाच्या इमारतीचा ताबा गट ग्रामपंचायत, शिगवण यांच्याकडे देण्यात आला आहे. सदरहू इमारत वापरात असून पर्यटकांसाठी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे सरपंच, गट ग्रामपंचायत, शिगवन यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील ॲक्सिस बँकेमध्ये सोने तारण कर्जासाठी नेमलेल्या व्हॅल्युएटरने संगनमत करुन फसवणूक केल्याबाबत**

**(२१) १८४७७ (१२-८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील ॲक्सिस बँकेमध्ये सोने तारण कर्जासाठी नेमलेल्या रघुनाथ एस दिंडारेकर ॲन्ड सन्सच्या शरद लक्ष्मण नागवेकर (रा.ब्रम्हेश्वर पार्क) या व्हॅल्युएटरने संगनमत करुन १७ जणांचे बनावट सोने बँकेत तारण करुन ते सोने खरे असल्याचे प्रमाणपत्र देऊन ६५ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) होय, प्रकरणी शाहुपुरी पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे १८ आरोपीविरुध्द गु.र.नं. १३४/२०१५ भा.दं.वि. कलम १२०(ब), ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे दि १४/४/२०१५ रोजी गुन्हा दाखल आहे.

(२) व (३) सदर गुन्ह्याच्या तपासात आतापर्यंत ६ निष्पन्न आरोपींना अटक केली असून उर्वरित फरारी आरोपीचा लवकरात लवकर शोध घेवून अटक करण्याबाबत गुन्हाच्या तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**अहमदनगर जिल्हा रुग्णालयात उपचार घेणारा आरोपी फरार झाल्याबाबत**

**(२२) १८८७१ (१०-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा रुग्णालयात उपचार घेणारा आरोपी दि.३१ मे २०१५ रोजी फरार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकरणी जबाबदार असणा-या पोलीसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५)** :(१) होय,

प्रकरणी तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे गु.र.नं. १४५/ २०१५ भा.दं.वि. कलम २२४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(२) होय.

(३) श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. ७८/२०१५ या गुन्ह्यातील आरोपी पोलीसांच्या कायदेशीर रखवालीत असताना सिव्हील हॉस्पिटल, अहमदनगर येथे जाप्ताकामी नेमलेल्या २ पोलीस कॉंस्टेबल यांची नजर चुकवून पळून गेलेला आहे. सदर प्रकरणी जबाबदार २ पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून पुढील तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**उल्हासनगर महानगरपालिका (जि. ठाणे) प्रशासनाने ३२५ धोकादायक इमारतींची यादी जाहिर केल्याबाबत**

**(२३) १९००४ (११-०८-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिका (जि. ठाणे) प्रशासनाने ३२५ धोकादायक इमारतींची यादी जाहिर केली असून त्यापैकी २७ इमारती अतिधोकादायक असून त्यापैकी बहूतांश इमारती महानगरपालिकेने स्वखर्चाने बांधल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या यादीत पुर्नबांधणी झालेली कामेही दाखविण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५)** :(१) हे खरे नाही. उल्हासनगर महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणात सद्य:स्थितीत ३३९ इमारती धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापैकी २७ इमारती अतिधोकादायक आहेत. सदर २७ इमारतीपैकी कोणतीही इमारत उल्हासनगर महानगरपालिकेने स्वखर्चाने बांधलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेकडे भूकंप प्रतिरोधक इमारतीचे कोणतीही नोंद नसल्याबाबत**

**(२४) १९४०५ (११-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेकडे भूकंप प्रतिरोधक इमारतीचे कोणतेही नोंद नसल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूकंप प्रतिरोधक इमारतींचे रेकॉर्ड महानगरपालिकेकडे नसल्याचे नेमके काय कारणे आहेत,

(३) असल्यास, २००५ मधील नॅशलन बिल्डींग कोडच्या सुधारित नियमानुसार भुकंप प्रतिरोधक इमारत बांधण्याचे सुचविले आहे, परंतू प्रत्यक्षात नियमांचे उल्लंघन केले जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईमध्ये भुकंप झाल्यास त्यातून बचाव करण्यासाठी महानगरपालिकेने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत, उपाययोजनांचे काय स्वरुप आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही. इमारतीचे बांधकाम मंजूर केलेल्या आराखड्यामध्ये व संरचनाकार अभियंता यांनी दिलेल्या आराखड्यानुसार इमारतींचे बांधकाम पूर्ण करण्याची जबाबदारी विकासकाची असते, इमारतींची संरचना ब्युरो ऑफ भारतीय प्रमाणकाच्या (BSI) आएएस १८९३ भाग - १ २००२ अंतर्गत भूकंप विरोधक संरचनाकार इमारतींच्या डिझाईनची अट इमारतीच्या नामंजूरी सूचनेमध्ये (आय.ओ.डी.) टाकण्यात येते. त्यानुसार बांधकाम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र संरचनात्मक अभियंता यांचेकडून प्राप्त झाल्यानंतरच इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयात एका मध्यवर्ती नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून, हा कक्ष आपत्ती परिस्थितीत विविध यंत्रणांशी संपर्क व समन्वय साधण्याचे तसेच घटनास्थळी सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्याचे काम करतो. या कामांकरिता मध्यवर्ती कक्षात खालीलप्रमाणे सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत :-

थेट दुरध्वनी सेवा - ५ (१ फॅक्स)

विभागीय नियंत्रण कक्षांना जोडणाऱ्या हॉटलाईन्स - २४

विविध महत्वाच्या यंत्रणांना जोडणाऱ्या हॉटलाईन्स - २६

हॉटलाईन्सकरिता बॅकअप यंत्रणा - वरील ५० ठिकाणांना जोडणारी टाटा कंपनीची हॉटलाईन

बिनतारी यंत्रणात- महत्वाच्या ५८ ठिकाणांना जोडणारी

महापालिकेच्या महत्वाच्या व संबंधित अधिकाऱ्यांच्या वाहनांवर बिनतारी यंत्रणा बसविण्यात आलेली आहे.

बृहन्मुंबई शहरातील महत्वाच्या वाहतुक चौकात वाहतुक पोलीसांमार्फत बसविण्यात आलेल्या २३१ व महापालिकेमार्फत बसविण्यात आलेल्या ७ अशा एकूण २३८ सी.सी.टी.व्ही. कॅमेरांचे प्रक्षेपण

कोणतीही आपत्ती उद्‌भवल्यास महानगरपालिकेचा नियंत्रण कक्ष सुरु राहण्याकरिता डिझेलवर चालणारी २ विद्‌युत जनित्रे, छोटे स्वयंपाकघर, कर्मचाऱ्यांकरिता आरामकक्ष इत्यादी सुविधा या कक्षात उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**राज्यामध्ये विविध ठिकाणी गेल्या दहा वर्षापासून आलेले**
**२०२३ पाकिस्तानी नागरीक राहत असल्याबाबत**

**(२५) १९४२२ (१२-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये विविध ठिकाणी गेल्या दहा वर्षापासून आलेले २०२३ पाकिस्तानी नागरीक राहत असल्याचे माहे मार्च, २०१५ निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये पाकिस्तानी नागरीकांकडून देशघातक कृत्य केली जात असल्याने जनतेमध्ये भितीचे वातावरण आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने पाकिस्तानी नागरीकांचा शोध घेण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) राज्याच्या विविध ठिकाणी गत १० वर्षापासून मार्च, २०१५ पर्यंत ३०९९ पाकिस्तानी नागरिक दिर्घ व्हीसा/अल्प मुदत व्हिसा ई. वर वास्तव्य करीत आहेत.

(२) गेल्या १० वर्षामध्ये सदर पाकिस्तानी नागरिकांकडून देशविघातक कृत्य केल्याबाबतचा कोणताही गुन्हा नाही.

(३) राज्यात वेळोवेळी मुदतबाहय वास्तव्यास असणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांचा शोध घेण्यात येत असतो व अवैधरित्या पाकिस्तानी नागरिक सापडल्यास त्याचेविरुध्द उचित कायद्यान्वये कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) जुना आग्रारोड वरील पिवळा पंप भागात एस.टी.बस चालकास मारहाण करुन बसवर दगडफेक केल्याबाबत**

**(२६) १९५४८ (१०-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) जुना आग्रारोड वरील पिवळा पंप भागात काही अज्ञात इसमानी एस.टी.बस चालकास मारहाण करुन बसवर दगडफेक केल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमरास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कारवाई केली करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) होय.

सदरची घटना दि.३१/०३/२०१५ रोजी घडली आहे.

(२) होय,

सदर बस चालकाने दिलेल्या फिर्यादीवरुन ४ आरोपींविरुध्द मालेगाव शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१७/२०१५ भा.दं.वि. कलम ३५३, ३३२, ३३६,४२७,५०४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(३) सदर गुन्ह्यातील १ आरोपीस अटक करण्यात आली असून त्यास न्यायालयाने जामीनावर सोडले आहे. सदर आरोपीविरुध्द दि. १६/०६/२०१५ रोजी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी मालेगाव येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**कल्याण(जि. ठाणे) रेल्वे स्थानक परिसरामध्ये एका तरुणीवर सामुहिक बलात्कार केल्याबाबत**

**(२७) १९९२१ (१२-०८-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) रेल्वे स्थानक परिसरामध्ये दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास एका तरुणीवर सामुहिक बलात्कार केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेतील पिडीत तरुणीवर अत्याचार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच रेल्वेस्थानक परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले नसल्याने महिलांच्या सुरक्षिततेकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) ठाणे पोलीस आयुक्तालयातील कोळसेवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत कल्याण स्टेशनमधील यार्डमध्ये एका बांगलादेशीय तरुणीवर सामुहिक बलात्कार झाला आहे.
(२) कोळसेवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.न. २४५/२०१५ भा.दं.वि. कलम ३७६(ग), ३२३, ३७०, ३४ सह अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियम कलम ५, ८ प्रमाणे गुन्हा दाखल असून, सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.
(३) कल्याण रेल्वेस्थानक परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील म्हाडाची बनावट वेबसाईट बनवून लोकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(२८) २०८६३ (१०-०८-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील म्हाडाची बनावट वेबसाईट बनवून लोकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत म्हाडाच्या अधिका-यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केलेली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी सायबर पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र.२१/१५, कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ भा.दं.वि.सं. सह कलम ४३(अ), ६६-क, ६६-ड माहिती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत २००८) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदरहू गुन्ह्याचा तपास करुन आरोपी नामे राजेशकुमार समुरेसिह तेवेतिया, हरियाणा यांस दिनांक २३/४/२०१५ रोजी अटक करण्यात आली. तसेच त्याला दिनांक ३०/०४/२०१५ रोजी अटक करण्यात आली. तसेच त्याला दिनांक ३०/०४/२०१५ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर होती.

तद्नंतर सदरहू अटक आरोपी हा न्यायालयीन कोठडीत कारागृहात असताना मा.न्यायालयने त्याला दि. ८/५/२०१५ रोजी जामीनावर मुक्त केले आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील कोंढाणे धरणाचे पाणी नवी मुंबईला मिळण्याबाबत

**(२९) २०९४८ (११-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील कोंढाणे धरणाचे पाणी नवी मुंबईतील नियोजित होणा-या विमान प्राधिकरणाला मिळण्याबाबत सिडको प्रशासनाने शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती निर्णय घेतला आहे,

(३) अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५)** :(१) सिडको प्रशासनाने नवी मुंबई प्रकल्प व नैना प्रकल्पासाठी नागरी वसाहतीला लागणा-या पाणी पुरवठ्याच्या गरजेकरीता रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील कोंढाणे धरणाचे पाणी राखीव ठेवण्याबाबत कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचेकडे विनंती केलेली आहे.

(२) कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने तत्वत: अनुकुलता दर्शविलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईत उचित ठिकाणी माहिती केंद्र उभारण्यासाठी सिडकोने भूखंड उपलब्ध करून देण्याबाबतची केलेली मागणी**

**(३०) २११७५ (०६-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील नागरिकांना तसेच क्रीडाप्रेमींना ऑलिंपिक, एशियाड, फुटबॉल, हॉकी, लॉन टेनिस, बॅटमिटन इत्यादी आंतरराष्ट्रीय क्रीडा महोत्सव देशात व परदेशात कोठे सुरु आहेत त्यांचा कालावधी काय आहे याची अद्ययावत माहिती मिळण्याकरीता नवी मुंबईत उचित ठिकाणी माहिती केंद्र उभारण्यासाठी सिडकोने भूखंड उपलब्ध करून द्यावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व्यवस्थापकीय संचालक, सिडको व मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) व (२) होय,

मुंबई महानगरपालिकेस क्रिडा उपक्रमाकरीता वाशी, सेक्टर १२ येथील भूंखड क्र. १९६-ए (२९१७.७८ चौ.मी) वाटप केला आहे, सदर भूखंडावर नवी मुंबई महानगरपालिका माहिती केंद्र स्थापन करुन शकते,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या घरातील एका व्यक्तीला सिडको कार्यालयात सामावून घेण्याबाबत**

**(३१) २११८३ (११-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या घरातील एका व्यक्तीला सिडको कार्यालयात सामावून घेण्यात येईल असे सिडकोने ग्रामस्थांना आश्वासन दिल्यानंतरच ग्रामस्थांनी आपल्या जमिनी सिडकोला दिल्या त्यानुसार काही प्रकल्पग्रस्त व्यक्तींना सिडकोने नोकरीत सामावून घेतले परंतु अद्यापि हजारो प्रकल्पग्रस्तांना सिडकोने नोकरीत सामावून न घेतल्याची बाब मे, २०१५ मध्ये उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीला सिडको कार्यालयात सामावून घेण्याबाबत शासन स्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

सिडकोमध्ये जेव्हा पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात येत त्यावेळेत शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना एकूण संवर्ग बळाच्या ५% पदावर सर्वोच्च प्राथक्यक्रम देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई क्षेत्रातील नागरिकांना सार्वजनिक सुविधा पुरविण्यासाठी सिडको महामंडळाकडून भूखंड हस्तांतरीत करुन मिळणेबाबत**

**(३२) २११९० (११-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने डिसेंबर २०१२ पर्यंत नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेल्या सार्वजनिक वापराच्या ५४१ भूखंडाचे नियमानुसार करारनामे करुन द्यावेत, ५५ सार्वजनिक वापराच्या भूखंडापैकी हस्तांतरीत केलेल्या २३ भूखंडाचे व अद्याप हस्तांतरीत न केलेल्या ३२ भूखंडाचे करारनामे करुन ते भूखंड नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करावेत व उर्वरित ४९१ भूखंड नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबतची कार्यवाही सिडको महामंडळाने करावी अशा सूचना दिनांक २० सप्टेंबर २०१३ रोजी मा.तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांसमवेत झालेल्या बैठकीत सिडकोला देण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सिडको महामंडळाकडून अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कार्यवाही न करण्याची कारणे काय व ही कार्यवाही पूर्ण करुन भूखंड हस्तांतरणास किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) व (२) सार्वजनिक वापराच्या ५४१ भूखंडाचे करारनामे सिडको महामंडळाने नवी मुंबई महानगरपालिकेसोबत केले आहेत, यापैकी २७८ भूखंड सिडकोने नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित केले आहेत. तसेच, ५५ सार्वजनिक वापरासाठीच्या भूखंडापैकी २३ भूखंड सिडकोने नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

(३) उर्वरित भूखंड हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु असून त्यासाठी सुमारे ७ ते ८ महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जणधन योजनेच्या माध्यमातून रोजगार देण्याच्या नावाखाली फसवणूक करणारी टोळी कार्यरत असल्याबाबत**

**(३३) २१४२५ (१२-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जनधन योजनेच्या माध्यमातून रोजगार देण्याच्या नावाखाली पैसे उकळणारी व फसवणूक करणारी टोळी कार्यरत असून नाशिकजवळील नानेगाव येथील महाविद्यालयीन युवतीची फसवणूक केल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या फसवणूकीची तक्रार नाशिक येथील स्थानिक पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) व (२) प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे एकही गुन्हा किंवा तक्रार पोलीस स्टेशन मध्ये दाखल नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोयना (जि.सातारा)धरण प्रकल्पातील पटेल कंपनीच्या कार्यालयाची तोडफोड केल्याबाबत**

**(३४) २१९१२ (१०-०८-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना (जि.सातारा) धरण प्रकल्पाच्या डाव्या पायथागृहाचे काम पटेल कंपनी करीत असून या कंपनीच्या कार्यालयाची सुमारे ३० गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनी दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी तोडफोड करून सुमारे १२ लक्ष रुपयांचे नुकसान केले असून कंपनीने गुन्हेगारावर कारवाई करण्याची मागणी जिल्हा पोलिस प्रमुख यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोडतोड करणाऱ्यांवर कोयनानगर येथील पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हाही नोंद करण्यात येवून त्यांना दोन ते तीन दिवसाची पोलिस कोठडी देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे प्रकार या विभागात सातत्याने होत असून शासनाने या सर्व प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) होय,
(२) होय.

सदर प्रकरणी कोयनानगर पो.ठाणेत गु.र.नं. १३/२०१५ भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ४५२, ४२७, ३२३, ५०४, ५०६, मा.पो.का.क. ३७(१) (३)/१३५ सार्व. मा.वि.का.क.३ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे. गुन्ह्यांत एकूण ११ आरोपींना दिनांक २३/०३/२०१५ रोजी अटक करुन आरोपींची ३ दिवस पोलीस कोठडी घेण्यात आली आहे.

(३) असे प्रकार यापुर्वी सातत्याने घडले नाहीत. उपरोक्त गुन्ह्याची तात्काळ दखल घेवून गुन्हा दाखल करुन गुन्ह्यातील एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे व गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील विविध ‘क’ वर्ग पर्यटन स्थळाच्या विकास कामांना मंजूरी देण्याबाबत**

**(३५) २२६६७ (१४-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील (१) बेळ कोणी नृसिंह मंदिर ता.बिलोली (२) संगम महादेव मंदिर ता.बिलोली (३) बेळकोणी (खु) कृष्ण मंदिर ता. बिलोली (४) लघूल मारोती मंदिर ता.बिलोली (५) मलकापूर हनूमान मंदिर (६) खानापूर महादेव मंदिर ता.देगलूर (७) शेळगाव नृसिंह मंदिर (८) करडखेड महादेव मंदिर ता.देगलूर (९) होट्टल भवानी मंदिर ता.देगलूर या ‘क’ वर्ग पर्यटन स्थळाच्या विकास कामांना मंजूरी देवून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे कय,

(२) असल्यास, सदर ‘क’ वर्ग पर्यटन स्थळाचं विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) होय,
(२) व जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सदर पर्यटनस्थळांवर हाती घ्यावयाच्या कामाचे अंदाजपत्रक व आराखडा तयार करुन त्यांना सादर करण्याबाबत संबंधित यंत्रणांना कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे शहरात रिक्षाचालकाने महिला पत्रकाराशी गैरवर्तन केल्याबाबत**

**(३६) २२७५२ (१२-०८-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात रिक्षाचालकाने महिला पत्रकाराशी गैरवर्तन केल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रिक्षाचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५)** :(१) फिर्यादी महिलेस घाबरविण्याचे उद्देशाने रिक्षा वाहतूकीचे नियमाकडे दुर्लक्ष करुन रिक्षा भरधाव वेगाने चालवून फिर्यादीचे जिवीतास इजा पोहोचवीण्याचे उद्देशाने रिक्षा रस्त्याचे कडेला असलेल्या कारला धडक मारुन अपघात केला.
(२) अपघातात फियार्ददीचे डावे हाताला, पायाला, दोन्ही गुडघ्याला व शरीराच्या उजव्या बाजुला मुका मार लागला झाला आहे. तसेच फिर्यादी महिलेला मदत न करता पोलीसांना अपघाताची खबर न देता पळून गेला म्हणून रिक्षा चालकांवर कापुरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. २०१/२०१५ भा.द.वि. कलम २७९, ३३६, ३३७, ३२७ सह मोटार वाहन अधिनियम कलम १८४, १३४ प्रमाणे दिनांक २८.४.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यात रिक्षा चालकसा अटक करण्यात आले असून, त्याचे विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शिंदखेडा( जि.धुळे) येथील पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्ह्यांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(३७) २२७९७ (१०-०८-२०१५). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिंदखेडा पोलीस स्टेशन जि.धुळे येथे सन २०१२ च्या तुलनेत सन २०१४ मध्ये खून, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, घरफोडी, चोरी, बलात्कार, दंगा, अपघात व इतर अपघात अशा गुन्ह्यांच्या संख्येत कमालीची वाढ झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी कर्मचा-यांची अपूरी संख्या कारणीभूत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५)** :(१) प्रश्नात नमुद पोलीस स्टेशन येथे सन २०१२ मध्ये एकूण १२० गुन्हे दाखल झाले होते. त्या तुलनेत सन २०१४ मध्ये १५२ गुन्हे दाखल झाले. सबब, सन २०१२ च्या तुलनेत सन २०१४ मध्ये एकूण गुन्ह्यात ३२ ने वाढ झाली आहे.
(२) व (३) नाही.

सन २०१२ च्या तुलनेत सन २०१४ मध्ये ३ पोलीस कर्मचारी कमी आहेत, तथापि, ३ पोलीस अधिकारी मंजूर पदापेक्षा जास्त आहेत. सबब सन २०१२ व सन २०१४ मध्ये पोलीस ठाण्याचे संख्याबळ समान आहे. अपु-या संख्याबळामुळे गुन्ह्यात वाढ झाली असे म्हणता येणार नाही. दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने विहित प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात येत आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

**मुंबईतील डॉकयार्ड रोड येथे महानगरपालिकेच्या बाजार खात्यातील कामगार वसाहतीची इमारत कोसळून मृत्यू झाल्याबाबत**

**(३८) २२९२८ (१०-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डॉकयार्ड रोड येथे महानगरपालिकेच्या बाजार खात्यातील कामगार वसाहतीची इमारत सन २०१३ मध्ये कोसळून ६२ जणांचा मृत्यू झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृतांच्या वारसांना नोकरी देण्याचे आश्वासन तत्कालीन शासनाने दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मृतांच्या किती वारसांना नोकरीत सामावून घेतले वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, मृतांच्या वारसांना अद्यापी नोकरीत सामावून घेण्यात होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) मुंबईतील डॉकयार्ड रोड येथील महापालिकेची बाबू गेनू मंडई सेवानिवास्थानाची इमारत दिनांक २७.०९.२०१३ रोजी कोसळून झालेल्या दुर्घटनेमध्ये ६१ जणांचा मृत्यू झाला होता हे खरे आहे.

(२) होय. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुकंपा धोरणानुसार मृतांच्या वारसांना विशेष बाब म्हणून महापालिकेत नोकरी देण्याचा प्रस्ताव मंजूर झाला असून शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना महानगरपालिकेच्या सेवेत समाविष्ट करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते.

(३) सदर दुर्घटनेत महानगरपालिकेचे ९ कर्मचारी व १ सेवानिवृत्त कर्मचारी मृत पावले होते. मृत कर्मचा-यांच्या वारसांस नोकरी देण्याबाबतचे एकूण १० अर्ज महानगरपालिकेस प्राप्त झाले होते. त्यापैकी ७ प्रकरणे मंजूर झाली असून त्यापैकी ६ वारसांना महानगरपालिकेमार्फत नोकरी देण्यात आली आहे. एका प्रकरणामध्ये वारस सध्या अज्ञान असल्यामुळे त्यास महानगरपालिकेने नोकरीत सध्या सामावून घेतलेले नाही. परंतु तो जेव्हा सज्ञान होईल त्यावेळी त्याच्या शैक्षणिक अहर्तेनुसार त्यास महापालिकेमध्ये नियुक्ती दिली जाईल. अन्य ३ प्रकरणांमध्ये त्यांच्या वारसास नोकरी देणे महापालिकेच्या धोरणात बसत नसल्यामुळे त्यांचे अर्ज नामजूर करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर-उत्तर विभागातील यशोधरा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अवैध धंदे, असामाजिक कृत्ये, पोलीस प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे होत असल्याबाबत**

**(३९) २३९६५ (१२-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर उत्तर विभागातील गरीब नवाज नगर, येथून महिला व अल्पवयीन मुलींना पळवून नेणारे रॅकेट असून यशोधरा पोलीस ठाण्यात अश्या १७ महिला पळविल्याची नोंद आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अवैध धंदे, असामाजिक कृत्ये, पोलीस प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे होत असल्याने या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी पोलीस आयुक्त नागपूर यांना तक्रारी केल्या आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०१५) :**(१) नाही,

(२) सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अवैध धंदे, असामाजिककृत्ये, पोलीस प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे होत नाहीत,

या संदर्भात लोकप्रतिनिधीनी पोलीस आयुक्त, नागपूर यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत,

(३) नागपूर शहर पोलिस आयुक्तालयाअंतर्गत पोलीस स्टेशन यशोधरानगर हद्दीत खालीलप्रमाणे गुन्हे दाखल झाले आहेत,

(i) गु.र.क्र ९२/२०१५, भा.दं.वि. कलम ३६३ अन्वये अल्पवयीन मुलगी हरविल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता, सदर गुन्ह्यातील मुलगी परत आली असून आरोपींना अटक करण्यात आली आहे,

(ii) गु.र.क्र. १३२/२०१५, भा.दं.वि कलम ३६३ अन्वये अल्पवयीन मुलगी हरविल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर मुलीचा व आरोपीचा तपास सुरु आहे.

(iii) मिसींग क्र३/२०१५ मधील हरविलेली महिला स्वत: परत आली आहे.

(iv) मिसींग क्र. ३०/२०१५ मधल हरविलेल्या महिलेचा शोध घेणे सुरु आहे.

वरील अनु.क्र (iii) व (iv)येथे नमूद केलेली प्रकरणे पती-पत्नीच्या भांडणांमधून निर्माण झाली आहेत.

नागपूर शहर पोलीस आयुक्तालया अंतर्गत महिला व अल्पवयीन मुलींना पळवुन नेणारे कोणतेही रॅकेट नाही.

पोलीस यशोधरानगर हद्दीमध्ये कोणत्याही प्रकारचे संघटीत अवैध धंदे सुरु नाहीत.

सन २०१५ मध्ये या परिसरात लपून छपून जुगार व सट्टापट्टी खेळणाऱ्या एकूण ३२ जणांवर कार्यवाही करण्यात आली असून तसेच अवैध दारु बाळगणाऱ्या २६ जणांवर कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक येथील सिडको परिसरामध्ये स्वस्तात घरे देण्याबाबत केलेली फसवणूक

**(४०) २४६०६ (१०-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सिडको परिसरामध्ये स्वस्तात घरे देण्याचे अमिष दाखवून अनेकांची फसवणूक केल्याबाबतची तक्रार माहे एप्रिल २०१५ मध्ये स्थानिक पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले व संबंधित दोषींवर कारवाई करण्यात आली आहे काय

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) माहे एप्रिल, २०१५ मध्ये अशा प्रकारची तक्रार नाशिक पोलीस आयुक्ताच्या कार्य कक्षेतील पोलीस स्टेशन मध्ये दाखल झालेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक सातपुर येथील व सिडको परिसरामध्ये दिवसेंदिवस गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(४१) २४६०७ (१२-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक, सातपुर येथील व सिडको परिसरामध्ये दिवसेंदिवस गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात खुनाचा प्रकार घडलेला असल्याने नागरिकांमध्ये मोठी घबराट निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संपुर्ण नाशिक शहरामध्ये गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्याचे दृष्टीने शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) नाशिक शहरात सन २०१३ मध्ये ३०३७, सन २०१४ मध्ये ३१६४ व सन २०१५ जुलै अखेर २००९ गुन्हे दाखल असून सध्या गुन्हेगारी नियंत्रणात आहे.

(२) हे खरे नाही. सातपुर पोलीस स्टेशन हद्दीत खुनाचे प्रकरण हे पुर्वीच्या आपआपसातील गुन्हेगारी वादातुन झाल्याचे निषन्न झाले असून गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून जनतेत कोणतीही घबराट नाही.

(३) सदर गुन्हेगारी प्रवृत्तीस प्रतिबंध व्हावा याकरिता पोलीस ठाणे हद्दीत नियमतीपणे अचानक कोम्बींग ऑपरेशन, ऑलआउट ऑपरेशन, झोपडपट्टी चेकींग, जेल रिलीज आरोपीतांना चेक करणे, तडीपार गुन्हेगार चेक करणे, गुन्हेगारी टोळ्यांतील क्रियाशील सदस्यांवर प्रतिबंधक कारवाई करणे, रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर नियमीतपणे व प्रभावीपणे प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे, हॉटेल/लॉजेस चेक करुन त्याद्वारे गुन्हेगार चेक करणे इत्यादी उपाययोजना राबवून त्याद्वारे गुन्हेगारी नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस ठाणे मार्फत नियमीतपणे कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

**नाशिक शहरातील सिडको भागातील काझीगढी येथे दुचाकी जाळण्यात आल्याबाबत**

**(४२) २४६०८ (१०-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील सिडको भागातील काझीगढी येथे तीन दुचाकी जाळण्यात आल्याच्या घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक शहरामध्ये असे प्रकार वारंवार घडत असतांना देखील पोलिस यंत्रणेकडून याबाबतच्या तक्राराची दखल घेतल्या जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच काही समाजकंटकाकडून असे प्रकार सातत्याने घडत असल्याने यास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाकडून काय उपाययोजना केल्या जात आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) व (२) प्रश्नात नमूद सिडको भागातील काझीगढी येथे दुचाकी वाहन जाळण्यात आल्या नाहीत, तथापि, नाशिक शहरातील भद्रकाली पोलीस स्टेशन व इंदिरानगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ९९/२०१५ भां.दं.वि. कलम ४३५ गु.र.नं. १६९/२०१५ भा.दं.वि. कलम ४२५ तसेच इंदिरानगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १३०/२०१५ भा.दं.वि. कलम ४३५ असे एकुण ३ गुन्हे दाखल करण्यात आले असून गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे,
(३) समाजकंटकाकडून असे प्रकार घडत असल्याने प्रत्येक पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस ठाणेच्या हद्दीत संवेदनशील भागात गस्त घालण्याबाबत सुचना देण्यात आल्या असून पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना पो.स्टे. हद्दीतील नागरीकांना तसेच सोसायटी मधील रहीवाशी यांना अश्या प्रकारच्या घटना घडू नये याकरीता बैठका घेण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच रात्रगस्तच्या वेळी पोलीस स्टेशनच्या पिटर, मोबाईल, सि.आर. मोबाईल बिट मार्शल वरील अधिकारी-कर्मचारी तसेच प्रत्येक सेक्शन हद्दीतील अमंलदार यांना सतर्क पेट्रोलींग करण्याबाबत सुचना देवून रेकॉर्ड वरील गुन्हेगार यांना वेळोवेळी चेक करुन त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही करण्याबाबत सुचीत केलेले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**नाशिक येथील संदर्भ सेवा रुग्णालय हे दारुडयांचा अड्डा बनलेला असल्याबाबत**

**(४३) २४६१० (१२-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील संदर्भ सेवा रुग्णालय हे दारुडयांचा अड्डा बनला असल्याची बाब माहे एप्रिल २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक व पोलीस आयुक्त, नाशिक यांच्याकडे लेखी तक्रार देखील करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही. अशा प्रकारची तक्रार प्राप्त नाही. तथापि, संदर्भ रुग्णालयाने कायमस्वरुपी पोलीस चौकीची स्थापना करुन सी.सी.टी.व्ही. कॅमेरे सदर परिसरात बसविण्याबाबत स्थानिक संस्था व रहीवाशी यांनी अर्ज केला आहे.
(३) दारुडयांचा अड्डा असल्याबाबत निदर्शनास आलेले नाही. पोलीस स्टेशन हद्दीतील संदर्भ सेवा रुग्णालय, व शालीमार हॉस्पीटल या परिसरात नियमित बीट मार्शल, मोबाईल पेट्रोलींग ठेवण्यात आले. असून, सदर रुग्णालयाच्या गेट जवळ सिंहस्थ कुंभमेळ्या निमित्त पोलीस चौकी बसविण्यात आलेली असून, तेथे कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

**नाशिक शहरात वाहनांची तपासणी करतांना युवकास मारहाण केल्याची घटना**

**(४४) २४६१३ (१०-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात वाहनांची तपासणी करतांना पोलीसांनी दुचाकी वरील युवकास मारहाण केल्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मारहाणीमुळे श्री.प्रीतम घोरपडे नावाच्या युवकाच्या डोळ्यास गंभीर जखम झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारे वाहनांची तपासणी करतांना ज्या पोलिसांनी मारहाण केली अशा पोलिसांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) व (२) नाशिक शहरात वाहनाची तपासणी करतांना पोलीसांनी कोणत्याही दुचाकी वरील युवकास मारहाण केल्याबाबत प्रकारची तक्रार अथवा फिर्याद दाखल नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरात मायक्रो लेझिंग फायनान्स कंपनीने पिग्मीवर आकर्षक व्याज देण्याचे आमिष दाखूवन फसवणूक केल्याबाबत**

**(४५) २४६२६ (१०-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात कार्यरत असलेल्या मायक्रो लेझिंग फायनान्स कंपनीने पिग्मीवर आकर्षक व्याज देण्याचे आमिष दाखूवन सोलापूरमध्ये सुमारे ३०० ग्राहकांची ६८ लाख रुपयांची फसवणूक सन २००३ पासून केली असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित फायनान्स कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच ग्राहकांचे पैसे परत करण्याकरिता कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) होय.
प्रकरणी जेल रोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे १२ आरोपीविरुध्द दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी. गु.र.नं. ६८/२०१५ भा.द.वि. कलम ४०६ , ४२०, ३४ सह एमपीआयडी ॲक्ट, १९९९ कलम हे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात अला आहे.
(२) व (३) दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने ७ आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींना पोलीस व न्यायालयीन कोठडी घेवून तपास करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सदर ७ आरोपी जामिनावर आहेत. गुन्ह्यातील कंपनीच्या मालमत्तेची माहिती जमा करण्यात येत असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यात हॉटेल व्यवसायात ३६ टक्के व विट भट्टयांवर २६ टक्के बाल कामगार आढळून आल्याबाबत**

**(४६) २५३२८ (१०-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हॉटेल व्यवसायात ३६ टक्के तर विट भट्टयांवर २६ टक्के बाल कामगार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय यंत्रणेतील उदासीनतेमुळे बालकांना त्यांच्या हक्कापासून वंचित राहावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या विविध विभागांमध्ये असलेला असमन्वय त्यास मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने बालकांच्या हक्काबाबत कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत वा घेणार आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (१३-१०-२०१५)** :(१) हे खरे नाही, तथापि, जिल्हास्तरीय कृतीदलांनी गेल्या तीन वर्षात घातलेल्या धाडसत्रांदरम्यान सुटका केलेल्या १२९९ बालकामगारांपैकी ३८१ बालकामगार हॉटेल व्यवसायात, तर १४ बालकामगार वीट भट्टी व्यवसायात काम करीत असल्याचे निदर्शनास आले आहे,
(२), (३) व (४) हे खरे नाही,

बालकामगार या अनिष्ट प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी राज्य शासन कटिबध्द असून प्रसिध्दी माध्यमाद्वारे जनजागृती करणे, वेळोवेळी सामूहिक धाडी टाकून बालकामगार आढळल्यास त्यांची सुटका करणे, त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे, तसेच दोषी आस्थापनांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याने याबाबतीत शासन उदासीन आहे असे म्हणता येणार नाही.

---

## श्री.धिरेंद्र रामजी वोरा, यांना केलेल्या भूखंड वाटपात सिडको प्राधिकरणाकडून झालेली फसवणूक

**(४७) २६५३२ (११-०८-२०१५). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.धिरेंद्र रामजी वोरा, रा.नवी मुंबई यांना सिडको प्राधिकरणाकडून भूखंड क्र.१७, सेक्टर ८, घणसोली, नवी मुंबई येथील २०२१.६४० चौ.मी.क्षेत्रफळाचा भूखंड दि.३१.१.२०१२ रोजी वाटप करण्यात आला होता व भूखंडाची संपूर्ण रक्कम सिडको नियमानुसार त्यांनी व्याजासहित फेब्रुवारी, २०१३ मध्ये सिडको प्राधिकरणाकडे भरणा केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.वोरा हे सदर भूखंडाचा ताबा घेण्यासाठी गेले असता त्या भूखंडावर प्रचंड अनधिकृत झोपडया असल्याची बाब निदर्शनास आल्याने श्री.वोरा यांनी सिडको प्राधिकरणास त्यांची फसवणूक झाली असल्याबाबत व त्या भूखंडाऐवजी अन्य भूखंड वाटप करण्याबाबत विनंती अर्ज करुनही सिडको प्राधिकरणाने या बाबीकडे दुर्लक्ष केले असल्याने श्री.वोरा यांची घोर फसवणूक झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी (कुलाबा) सिडकोच्या कार्यकारी संचालकांना दिनांक ९ जून, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.वोरा यांना वाटप केलेल्या भूखंडाऐवजी तेवढ्याच क्षेत्रफळाचा अन्य भूखंड देण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :**(१) व (२) होय, श्री.धिरेंद्र रामजी वोरा, रा.नवी मुंबई यांना सिडको प्राधिकरणाकडून भूखंड क्र.१७, सेक्टर ८, घणसोली, नवी मुंबई येथील २०११.६४० चौ.मी. क्षेत्रुळाचा भूखंड दि.३१.१.२०१२ रोजी वाटप करण्यात आला होता परंतु, सदर भूखंडावर अनधिकृत झोपड्या व चाळी असल्याने उक्त भूखंडाचा ताबा देण्यात आला नाही. परंतु सिडकोकडे जमा केलेली भाडेपट्ट्याची व इतर संकीर्ण रक्कम श्री.वोरा यांना सिडकोने धनादेशाद्वारे दि.९.१०.२०१५ रोजी परत केली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिमायतनगर (जि.नांदेड) शहरातील एका गुटखा विक्री करणाऱ्याच्या घरावर छापा टाकल्याबाबत**

**(४८) २६७७७ (१२-०८-२०१५). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिमायतनगर (जि.नांदेड) शहरातील एका गुटखा विक्री करणाऱ्याच्या घरावर भोकरचे सहायक पोलिस अधिक्षक यांनी दिनांक २६ एप्रिल, २०१५ रोजीच्या सुमारास छापा टाकला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या छाप्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :**(१) होय,
सहायक पोलीस अधिक्षक, उप विभाग भोकर व अन्नसुरक्षा अधिकारी , अन्न व औषध प्रशासन विभाग यांनी स्थानिक पोलीसांच्या मदतीने छापा टाकला होता.
(२) सदर छाप्यात आरोपीच्या परातुन रु. २५३३५८/- रुपयाचा विविध कंपनीचा शासनाने बंदी घातलेला गुटखा मिळून आल्याने आरापींविरुध्द पोलीस ठाणे हिमायतनगर येथे गु.र.नं. ४०/२०१५ २६ (१) २६ (२), २७ (३) डी.ई. शि.पा. २९ अ.सु.मा.का. व १८८,२७३,३२८,३४, भा. दं. व. नुसार गुन्हा दाखल केला आहे, गुन्हयांच्या तपास चालु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**नांदेड येथील हिंगोली गेट रेल्वे उड्डान पूलाजवळ रिक्षा चालकाचा मृत्यू झाल्याबाबत**

**(४९) २६८७६ (१२-०८-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथील हिंगोली गेट रेल्वे उड्डान पूलाजवळ नांदेड वाहतूक शाखेच्या वाहन तपासणी मोहिमेच्या वेळी शिवाजी गणपत कसबे या रिक्षा चालकाचा दिनांक ६ जून, २०१५ रोजीच्या सुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मयत ऑटो चालकांच्या मृत्यूस पोलिस जबाबदार असल्याची तक्रार नातेवाईकांनी केली असून ऑटो संघटनांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५)** :(१) नाही.

दिनांक ३० मे, २०१५ रोजी प्रश्नात नमुद ठिकाणी नांदेड वाहतुक शाखे मार्फत वाहनाच्या कागदपत्र तपासणीत नमूद रिक्षा चालकाकडे वाहनाचे कागदपत्र नसल्याने मोटार वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करण्यासाठी सदर रिक्षावाल्यास पोलीस मुख्यालयात घेवून जात असतांना रस्त्यात त्याची तब्बेत अचानक बिघडल्याने त्यास सरकारी दवाखाना नांदेड येथे उपाचारासाठी नेले होते. वैद्यकीय अधिकारी यांनी उपचार करुन सदर रिक्षावाल्यास मृत घोषीत केले.
(२) ऑटो चालकाच्या मृत्यूस पोलीस जबाबदार असल्याची तक्रार ऑटोचालकाच्या नातेवाईकांची केली आहे.
(३) नमूद ऑटो चालकाच्या मृत्यू बाबत वजीराबाद पोलीस स्टेशन, नांदेड येथे अकस्मात मृत्यूची नोंद करुन सदर अकस्मात मृत्यूचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे देण्यात आला असून तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयामध्ये सन २०१४-१५ मध्ये शहरी व ग्रामीण भागामध्ये चो-यांचे व दरोडयांचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(५०) २७१३५ (१२-०८-२०१५). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयामध्ये सन २०१४-१५ मध्ये शहरी व ग्रामीण भागामध्ये चोऱ्यांचे व दरोडयांचे प्रमाण वाढल्यामुळे तसेच पोलीस प्रशासन अवैध धंद्याला संरक्षण देत असल्याने जनता भयभीत झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५)** :(१) सन २०१४ मध्ये दरोड्याचे दाखल १९ गुन्हयांपैकी १६ गुन्हे उघड केले आहेत. जबरी चोरीचे दाखल ४० गुन्हयांपैकी २२ गुन्हे उघड केले आहेत. घरफोडीच्या दाखल २०६ गुन्हयांपैकी १३३ गुन्हे उघड केले आहेत.

सन २०१५ माहे जुलै अखेर दरोड्याचे दाखल १२ गुन्ह्यांपैकी ९ गुन्हे उघड केले आहेत. जबरी चोरीचे दाखल ३२ गुन्ह्यांपैकी १३ गुन्हे उघड केले आहेत. घरफोडीच्या दाखल १०६ गुन्ह्यांपैकी २३ गुन्हे उघड केले आहेत. चोऱ्यांच्या दाखल ३१५ गुन्ह्यांपैकी ७५ गुन्हे उघड केले आहेत. अवैध धंद्याविरोधात वेळीच कारवाई केली आहे. चोरीस गेलेला माल हस्तगत करुन गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली आहे. सबब जनता भयभीत झालेली नाही.

(२) वरील प्रमाणे दरोडा, चोरी या सदराखाली दाखल गुन्हे उघडकीस आणुन गुन्ह्यांतील गेळामाल हस्तगत करण्यात आलेला आहे. तसेच अवैध प्रवाशी वाहतुकी विरुध्द कारवाई करुन दंड वसुली करण्यात आलेला आहे.

दरोडा, चोरी या सदराखाली गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी व उप विभागीय पोलीस अधिकारी याना पो.स्टे.चे कार्यक्षेत्रात सक्त व परिणामकारक पेट्रोलींग करणे बाबत सूचना देण्यात आलेल्या असुन त्याप्रमाणे कार्यवाही चालु आहे. तसेच या सदराखाली गुन्हे उघडकीस आणणे बाबत सर्व संबंधित तपासीक अंमलदार व स्थानीक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांना सुचना देवून मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.